विलासराव देशमुख शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, लातुर
VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, LATUR
मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधी चौक, लातुर
Near Marwadi Rajasthan School, Gandhi Chowk, Latur. ( Maharashtra ) 413512
दुरध्वनी क्र. (०२३८२) २४७६७६ फॅक्स (२३८२ )२४९२९२मेल :- dean_gmchl@rediffmail.com

जा.क्र.विदेशावैमवरुला/भांडार/ 5118 /२०२४ दि.24/०६/२०२४

# निरुपयोगी लोखंडी साहित्य, लाकडी साहित्य, तांबे, पितळ, स्टील व ॲल्यमिनियम साहित्य, प्लॅस्टीक साहित्य, फर्निचर साहित्य, छोटी यंत्रसामुग्री, मोठी यंत्रसामुग्री, उपकरणे विक्री करण्याकरिता जाहिर दरपत्रक सुचना

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध प्रकारचे लोखंडी साहित्य, लाकडी साहित्य, तांबे, पितळ, स्टील व ॲल्युमिनियम साहित्य, प्लॅस्टीक साहित्य, छोटी यंत्रसामुग्री, उपकरणे हे निर्लेखन समितीच्या शिफारशीनुसार निर्लेखित करण्यात आलेले आलेले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत पाडण्यात आलेल्या जुन्या इमारतीमधील साहित्य यांची विक्री करण्यासाठी त्यांचे दर सहा महिन्याच्या कालावधी करिता निश्चित करुन ठेवण्याकरिता इच्छुक पुरवठादाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कालावधी दर निश्चित पत्र निघाल्याच्या दिवसापासुन सहा महिन्याकरिता राहील.

## दरपत्रक प्रकिया तपशील

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करावयाचा अंतिम दिनांक | दि.०५.०७.२०२४ |
| २ | विक्री करावयाचे निर्लेखीत साहित्य पाहण्याचा कालावधी | दि.२४.०६.२०२४ ते दि.०४.०७.२०२४ |
| ३ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक | दि. ०८.०७.२०२४ |

## निर्लेखीत साहित्य विक्री बाबत अत्यावश्यक कागदपत्रे व इतर अटी व शर्ती

१. दरपत्रका सोब्त अनामत रक्कम रु. १०,०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **DEAN,V.D.G.M.C & HOSPITAL, LATUR** नावे काढून सोबत जोडणे आवश्यक राहील.
२. दुकाने (व्यवसाय) आस्थापना अधिनियम नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आधारकार्ड, जीएसटी सादर करणे आवश्यक आहे.
३. या महाविद्यालय व रुग्णालयातील निर्लेखीत केलेले साहित्य तसेच सा.बां. विभागा मार्फत पाडण्यात आलेल्या जुन्या इमारतीमधील साहित्य, उपरोक्त नमुद करण्यात आलेल वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहील.
४. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यांनी सदर साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतचे दरपत्रक बंद लिफाफा मध्ये नमुद वेळापत्रकानुसार विहीत दिनांकापुर्वी कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत सदर दिनांका नंतर प्राप्त होणारे दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत. यास्तव विहीत दिनांकापुर्वी दरपत्रके या

कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधित दरपत्रक धारकाची राहील. याबाबत तक्रार चालणार नाही.

५. ज्या खरेदीदाराने सर्वात जास्त दर नमुद केले आहेत. अशा खरेदीदारास मंजुरी मिळाल्यानंतर सर्व माल स्वखर्चाने निर्लेखन विभागातुन उचलावा लागेल. तसेच माल ताब्यात घेतांना कार्यालयाच्या मालम-तेचे नुकसान झाल्यास त्याबाबतच्या मालम-तेच्या नुकसानीची भरपाई दयावी लागेल. तसेच साहित्य आहे त्या स्थितीत आहे त्या ठिकाणावरुन उचण्याची जबाबदारी संबंधिताची राहील.

६. ज्या खरेदीदारास मंजुरी आदेश निर्गमित करण्यात येतील अशा खरेदी दाराने आदेश दिल्यानंतर तीन दिवसात माल उचलणे बंधनकारक राहील.

७. दरपत्रकाबाबत दरपत्रकधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

८. दरपत्रकाच्या लिफाफा वर **निरुपयोगी साहित्य करिता दरपत्रक** असे स्पष्ट नमुद अधोरेखीत करावे.

९. सदरील दरपत्रक कोणत्याही टप्प्यावर स्विकारणे अथवा नाकारणे याचे संपुर्ण अधिकार अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१०. खालीलप्रमाणे निर्लेखीत/निरुपयोगी साहित्याचे सदर सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | वस्तुचे नाव | वजन | दर |
|---|---|---|---|
| १ | लोखंडी साहित्य | १ किलो | |
| २ | लाकडी साहित्य | १ किलो | |
| ३ | तांबेचे साहित्य | १ किलो | |
| ४ | पितळाचे साहित्य | १ किलो | |
| ५ | स्टील साहित्य | १ किलो | |
| ६ | ॲल्युमिनियम साहित्य | १ किलो | |
| ७ | प्लॅस्टीक साहित्य | १ किलो | |
| ८ | छोटी यंत्रसामुग्री | १ नग | |
| ९ | उपकरणे | १ नग | |
| १० | सा.बां. विभागामार्फत पाडण्यात आलेल्या इमारती मधील निरुपयोगी साहित्याचे (उदा- लोखंडी गज, अँगल, पत्रे, खिडक्या, अल्युमिनियम पार्टीशन, व इतर साहित्याचे दर किलोग्रॅम प्रमाणे स्वतंत्र देण्यात यावेत) | किलोग्रॅम प्रमाणे | |

अधिष्ठाता
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व रुग्णालय, लातूर.

प्रत- Notice Board & College Website V.D.G.M.C. Hospital, Latur